# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३८४/२०२३ दिनांक – ०२/११/२०२३

**जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेणा-या महीला वेश्यादला विरुध्द गुन्हा दाखल करून पिडीत महीलेची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रति. कक्ष नालासोपारा यांना यश**

नालासोपारा पोलीस ठाण्याचे हद्दीत एक महीला वेश्यादलाल ही एका पिडीत महीलेस जबरदस्तीने वेगवेगळया पुरुष गि-हाईकांसोबत वेश्यागमना करीता पुरवीत असल्याची गोपनीय माहीती पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांना मिळाल्यावरुन पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांनी ट्रान्सफॉरमींग लाईव्हज फाउंडेशनचे अधिकारी श्री मनोहर वाघेला व नम्रता मॅडम यांच्या मदतीने पिडीत महीलेस कार्यालयात आणले व तिने तिच्यावर झालेल्या अत्याचाराबाबत पो.नि.चौधरी यांना माहीती दिली की, पिडीत महीला ही १३ वर्षापुर्वी उत्तरप्रदेश येथून मुंबई येथे तिच्या काकांकडे राहण्यास आली असून तिच्या काकांनी ४ वर्षापुर्वी तिचे एका राजस्थानी इसमाशी लग्न करुन दिले. लग्ना नंतर काही महीन्यांनी तिचे तिच्या पती सोबत वाद झाल्याने ती पतीस सोडून मुंबई येथे आली त्यावेळी तिची **आरोपी महीला नामे मनिषा मोहन साव वय २९ वर्षे रा.रुम नं.३०४ ओम वरद विनायक बिल्डींग भावेश प्लाझा च्या मागे छेडा नगर नालासोपारा पश्चिम ता.वसई जि.पालघर** हीच्याशी ओळख झाल्याने तिच्या सोबत राहत होती. रुमवर राहील्याने तिने पिडीत हीच्याकडे रुमचे अर्धे भाडे मागीतले व पिडीत हीच्याकडे पैसे नसल्याने ती तिला भाडे देवू शकत नव्हती. त्यानंतर आरोपीत हीने पिडीत महीलेचे आंघोळ करीत असतानाचे तिच्या मोबाईल मध्ये फोटो काढून तिस ब्लॅकमेल करुन आरोपीत हीच्या रुमवर आलेल्या वेगवेगळया पुरुष ग्राहकांसोबत वेळोवेळी पिडीत हीस जबरदस्तीने वेश्यागमना करीता भाग पाडले व पिडीत हीने नकार दिला असता आरोपीत मनिषा हीने पिडीत हीचे आंघोळ करताना काढलेले नग्न फोटो सोशल मिडीयावर व्हायरल करेन अशी धमकी देवून वेगवेगळया पुरुष ग्राहकांकडून मोबदला व कमिशन घेवून जबरदस्तीने वेश्यागमना करीता भाग पाडले अशी हकिगत सांगितल्याने पिडीत हीचा जबाब घेवून आरोपीत हीचे विरुध्द नालासोपारा पो.स्टे गुन्हा रजि.नं । ५०५/२०२३, भादविसं कलम ३७०(१),३२३,३४२ पिटा ॲक्ट ३,४,५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री अमोल मांडवे यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पो.नि.संतोष चौधरी,पो.हवा. पवार, किणी, शेटये, म.पो.हवा. डोईफोडे, चा.पो.हवा. पागी,सर्व नेम. अनै.मा.वा. प्र.कक्ष नालासोपारा यांनी केली आहे.